17 APR 2025
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिष्टमंडळाचा सीमाभागातील विद्यार्थ्यांशी संवाद

## शिवाजी विद्यापीठात प्रवेशासाठी शंभरजणांची तयारी

कोल्हापूर, ता. १६ : बेळगावसह सीमाभागातील विद्यार्थ्यांना मोफत तसेच सवलतीच्या दरात शिक्षण घेता यावे, यासाठी शिवाजी विद्यापीठाने विविध अभ्यासक्रमांत राखीव जागांसह अनेक सवलती देण्यास गेल्या तीन वर्षांपासून सुरुवात केली आहे. यंदाही या उपक्रमाची माहिती देण्यासाठी विद्यापीठाच्या शैक्षणिक शिष्टमंडळाने सीमाभागातील विविध ठिकाणांना भेटी देऊन विद्यार्थी, पालकांशी सुसंवाद साधला. त्यांना ३० एप्रिलपर्यंत विद्यापीठात प्रवेश अर्ज दाखल करण्याचे आवाहन केले. या मोहिमेला पालक-विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षापासून बेळगावसह सीमाभागातील ८६५ गावांतील विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठाने प्रत्येक अभ्यासक्रमात १० टक्के राखीव जागा ठेवल्या आहेत. विज्ञान, वाणिज्य, कला व ललित कला यांसह अभियांत्रिकी अभ्यासक्रमांनाही विद्यार्थ्यांना प्रवेश घेता येऊ शकणार आहेत. यामध्ये अनुदानित अभ्यासक्रमांसाठी ट्युशन फी पूर्ण माफ असून, विनाअनुदानित अभ्यासक्रमांसाठी २५ टक्के सवलत देण्यात येते. वसतिगृहात राहू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना शुल्कात सवलत आहे. या योजनेची प्रत्यक्ष माहिती देण्यासाठी विद्यापीठाने विशेष समिती गठीत केली आहे. या समितीचे सदस्य डॉ. जगन कराडे, नवनाथ वळेकर, श्रीपाल गायकवाड, कविता वड्राळे, संतोष सुतार यांनी गेल्या आठवड्यात निपाणी, खानापूर, बेळगाव, उदगीर, भालकी या ठिकाणांना भेटी दिल्या. स्थानिक महाराष्ट्र एकीकरण समितीच्या पदाधिकाऱ्यांच्या सहकार्यातून इच्छुक विद्यार्थी आणि पालक यांच्याशी संवाद साधण्यात आला. सध्या या योजनेतून १०० हून अधिक विद्यार्थी विद्यापीठात शिक्षण घेत असल्याची माहितीही उपस्थितांना देण्यात आली.



कोल्हापूर : सीमाभागातील विद्यार्थ्यांसाठीच्या शिवाजी विद्यापीठाच्या योजनांच्या पत्रकाचे निपाणी येथे ज्येष्ठ विचारवंत प्रा. अच्युत माने यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. यावेळी जगन कराडे, नवनाथ वळेकर, श्रीपाल गायकवाड, संतोष सुतार, जयराम मिरजकर, बाबासाहेब मगदूम, उदय शिंदे, राजू मिस्त्री उपस्थित होते.

निपाणी येथे ज्येष्ठ विचारवंत डॉ. अच्युत माने यांच्या हस्ते शिवाजी विद्यापीठाच्या माहितीपत्रकाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी जयराम मिरजकर, बाबासाहेब मगदूम, उदय शिंदे, राजू मिस्त्री, तर खानापूर येथील बैठकीला गोपाळ मुरारी पाटील, आबासाहेब दळवी, संजीव पाटील, हेब्बाळकर गुरुजी, अमृत शेलार, राजाराम देसाई, पुंडलिक पाटील, अजित पाटील, केशव कळेकर उपस्थित होते. बेळगाव येथील कार्यक्रमास प्रकाश मरगाळे, मालोजी अष्टेकर, शिवराज पाटील, दत्ता उघाडे, महेश जुवेकर उपस्थित होते.

17 APR 2025 लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठच गेले सीमाभागात

## गावोगावी मिळाला उत्स्फूर्त प्रतिसाद

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** बेळगावसह सीमाभागातील विद्यार्थ्यांना मोफत तसेच सवलतीच्या दरात शिक्षण घेता यावे, यासाठी शिवाजी विद्यापीठाने विविध अभ्यासक्रमांत राखीव जागांसह अनेक सवलती देण्यास गेल्या तीन वर्षांपासून सुरुवात केली आहे. यंदाही या उपक्रमाची माहिती देण्यासाठी विद्यापीठाच्या शैक्षणिक शिष्टमंडळाने सीमा भागातील विविध ठिकाणांना भेटी देऊन विद्यार्थी, पालकांशी सुसंवाद साधला. त्यांना ३० एप्रिलपर्यंत अर्ज दाखल करण्याचे आवाहन केले.

विद्यापीठाने सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षापासून बेळगावसह सीमा भागातील ८६५ गावांतील विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक अभ्यासक्रमात १० टक्के राखीव जागा ठेवल्या आहेत. विज्ञान, वाणिज्य, कला व ललित कला यांसह अभियांत्रिकी अभ्यासक्रमांनाही विद्यार्थ्यांना प्रवेश घेता येऊ शकणार आहेत. यामध्ये अनुदानित अभ्यासक्रमांसाठी ट्यूशन फी पूर्ण माफ



सीमा भागातील विद्यार्थ्यांसाठीच्या योजनांच्या पत्रकाचे निपाणी येथे ज्येष्ठ विचारवंत प्रा. अच्युत माने यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. यावेळी मान्यवर उपस्थित होते.

असून विनाअनुदानित अभ्यासक्रमांसाठी २५ टक्के सवलत देण्यात येते. त्याखेरीज वसतिगृहात राहू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनाही शुल्कात सवलत आहे. या योजनेची प्रत्यक्ष माहिती देण्यासाठी विद्यापीठाने स्थापन केलेल्या समितीचे सदस्य डॉ. जगन कराडे, डॉ. नवनाथ वळेकर, डॉ. श्रीपाल गायकवाड, डॉ. कविता वड्राळे आणि डॉ. संतोष सुतार यांनी नुकतीच निपाणी, खानापूर, बेळगाव, उदगीर आणि भालकी येथे भेटी दिल्या. महाराष्ट्र एकीकरण समिती पदाधिकाऱ्यांच्या सहकार्यातून विद्यार्थी-पालकांशी संवाद साधला.

निपाणीत ज्येष्ठ विचारवंत डॉ. अच्युत माने यांच्या हस्ते माहितीपत्रकाचे प्रकाशन झाले. यावेळी जयराम मिरजकर, बाबासाहेब मगदूम, उदय शिंदे, राजू मिस्त्री उपस्थित होते. खानापूर येथील बैठकीला गोपाळ मुरारी पाटील, आबासाहेब दळवी, संजीव पाटील, हेब्बाळकर गुरुजी, अमृत शेलार, राजाराम देसाई, पुंडलिक पाटील, अजित पाटील, केशव कळेकर उपस्थित होते. बेळगाव येथील कार्यक्रमास प्रकाश मरगाळे, मालोजी अष्टेकर, शिवराज पाटील, दत्ता उघाडे, महेश जुवेकर यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

17 APR 2025

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# सीमाभागातील विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## सीमाभागातील विद्यार्थ्यांना शिवाजी विद्यापीठ अंतर्गत सवलतींची शिष्टमंडळाकडून माहिती

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

बेळगावसह सीमाभागातील विद्यार्थ्यांना मोफत तसेच सवलतीच्या दरात शिक्षण घेता यावे, यासाठी शिवाजी विद्यापीठाने विविध अभ्यासक्रमांत राखीव जागांसह अनेक सवलती दिल्या आहेत. यंदाही या उपक्रमांची माहिती देण्यासाठी शिवाजी विद्यापीठाच्या शैक्षणिक शिष्टमंडळाने सीमाभागातील विविध ठिकाणांना भेटी देऊन विद्यार्थी, पालकांशी सुसंवाद साधत दिली. त्यांना ३० एप्रिलपर्यंत शिवाजी विद्यापीठात प्रवेश अर्ज दाखल करण्याचे आवाहन केले. या मोहिमेला पालक–विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

सन २०२२–२३ या शैक्षणिक वर्षापासून बेळगावसह सीमाभागातील ८६५ गावांतील विद्यार्थ्यांसाठी शिवाजी विद्यापीठाने प्रत्येक अभ्यासक्रमात १० टक्के राखीव जागा ठेवल्या आहेत. विज्ञान, वाणिज्य, कला व ललित कला यांसह अभियांत्रिकी अभ्यासक्रमांनाही विद्यार्थ्यांना प्रवेश घेता येऊ शकणार आहेत. यामध्ये अनुदानित अभ्यासक्रमांसाठी ट्यूशन फी पूर्ण माफ असून विनाअनुदानित अभ्यासक्रमांसाठी २५ टक्के सवलत देण्यात येते. त्याखेरीज वसतिगृहात राहू इच्छिणाऱ्या



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या योजनांची सीमाभागातील विद्यार्थ्यांना माहिती देताना डॉ. जगन कराडे. सोबत डॉ. नवनाथ वळेकर, डॉ. श्रीपाल गायकवाड आदी.

विद्यार्थ्यांनाही शुल्कात सवलत आहे. इतरही अनेक सुविधा सीमाभागातील विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठ कॅम्पसवर उपलब्ध आहेत. या योजनेची प्रत्यक्ष माहिती देण्यासाठी विद्यापीठाने विशेष समिती गठित केली आहे. या समितीचे सदस्य डॉ. जगन कराडे, डॉ. नवनाथ वळेकर, डॉ. श्रीपाल गायकवाड, डॉ. कविता वड्राळे आणि डॉ. संतोष सुतार यांनी गेल्या आठवडाभरात निपाणी, खानापूर, बेळगाव, उदगीर आणि भालकी आदी गावांना भेटी दिल्या. स्थानिक महाराष्ट्र एकीकरण समिती पदाधिकाऱ्यांच्या सहकार्यातून इच्छुक विद्यार्थी आणि पालक यांच्याशी संवाद साधण्यात आला.

सध्या या योजनेतून १०० हून अधिक विद्यार्थी विद्यापीठात शिक्षण घेत असल्याची माहितीही उपस्थितांना देण्यात आली. निपाणी येथे ज्येष्ठ विचारवंत डॉ. अच्युत माने यांच्या हस्ते शिवाजी विद्यापीठाच्या माहितीपत्रकाचे प्रकाशन करण्यात आले. या जयराम मिरजकर, बाबासाहेब मगदूम, उदय शिंदे, राजू मिस्त्री उपस्थित होते. खानापूर येथील बैठकीला गोपाळ मुरारी पाटील, आबासाहेब दळवी, संजीव पाटील, हेब्बाळकर गुरूजी, अमृत शेलार, राजाराम देसाई, पुंडलिक पाटील, अजित पाटील, केशव कळेकर उपस्थित होते. तर, बेळगाव येथील कार्यक्रमास प्रकाश मरगाळे, मालोजी अष्टेकर, शिवराज पाटील, दत्ता उघाडे, महेश जुवेकर यांच्यासह पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 APR 2025
तरुण भारत



# शिवाजी विद्यापीठाच्या विविध परीक्षा सुरळीत

**कोल्हापूर:** शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल २०२४-२५ उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू आहेत. बुधवारी बी. ए., बी. कॉम., बी. एस्सी., बी. सी. ए, बी. लिप, बी. ए. बीएड, बी. आय. डी., एम. लिप., बी. बी. ए., एम. बी. ए. अशा ५१ अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरळीत झाल्या. १५९ परीक्षा केंद्रावर परीक्षा सुरळीत पार पडली. ही परीक्षा ३१ हजार १५९ विद्यार्थ्यांनी दिली. भरारी पथकाकडून कोल्हापूर ५, सांगली २ आणि सातारा १ अशा ८ गैरप्रकारांची प्रत्यक्ष नोंद परीक्षा प्रमाद समितीकडे केली आहे. या विद्यार्थ्यांवर नियमानुसार कारवाई केली जाणार आहे, तरी विद्यार्थ्यांनी नियमांच्या अधिन राहून परीक्षा द्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
17 APR 2025 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शैक्षणिक परिवर्तनासाठी ई-कंटेंट महत्त्वपूर्ण

## अधिष्ठाता डॉ. एम. एस. देशमुख यांचे मत

प्रतिनिधी
कोल्हापूर


नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या पार्श्वभूमीवर शैक्षणिक क्षेत्रात झपाट्याने बदल होत असून, या बदलांचा प्रभावी भाग म्हणजे ई-कंटेंट विकसन. विद्यार्थ्यांपर्यंत दर्जेदार शिक्षण पोहोचवण्यासाठी ई-कंटेंट महत्त्वपूर्ण माध्यम ठरणार आहे, असे मत मानव्य विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एम. एस. देशमुख यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र आणि शरण साहित्य अध्ययन यांच्या संयुक्त विद्यमाने पीएम उषा या योजनेअंतर्गत आयोजित कार्यशाळेत ते बोलत होते. 'अध्ययन संसाधनासाठी ई-कंटेंट विकसन' हा या कार्यशाळेचा विषय होता. अध्यक्षस्थानी शरण साहित्य अध्ययन समन्वयक डॉ. तृप्ती करेकट्टी होत्या.

डॉ. देशमुख म्हणाले, विद्यार्थ्यांपर्यंत तंत्रज्ञानाच्या साहाय्याने गुणवत्तापूर्ण शिक्षण पोहोचवण्याचे सामर्थ्य ई-कंटेंटमध्ये आहे. युजीसीच्या स्वयंम व स्वयंप्रभा या प्लॅटफॉर्म्सवरून विविध अभ्यासक्रम उपलब्ध होत असून, हे उपक्रम ऑनलाईन शिक्षणाला नवे वळण देत आहेत. विद्यापीठाच्या दूरशिक्षण केंद्रामार्फत महान व्यक्तींच्या जीवनकार्यावर आधारित अभ्यासक्रमांचे ई-कंटेंट तयार केले जात आहेत. हा उपक्रम भारतीय ज्ञान प्रणालीचा भाग असून भारतीय विचारविश्वाचा जागतिक प्रसार यामुळे साध्य होईल.

अध्यक्षस्थानावरून डॉ. करेकट्टी म्हणाल्या, महान व्यक्तींच्या विचारांचा प्रसार करण्यासाठी ई-कंटेंट हे प्रभावी माध्यम ठरणार आहे. त्यांचे कार्य नव्या पिढीपर्यंत पोहोचवणे ही काळाची गरज आहे.

प्रास्ताविक दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र प्रभारी संचालक डॉ. के. बी. पाटील यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. नितीन रणदिवे यांनी केले. आभार डॉ. संजय चोपडे यांनी मानले. यावेळी उपकुलसचिव व्ही. बी. शिंदे, डॉ. नलिनी वाघमारे, डॉ. भीमराव पाटील, चन्नावीर भद्रेश्वरनाथ, डॉ. एम. ई. तंगावर, डॉ. अरुण शिंदे, यश अंबोळे आदी उपस्थित होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण केंद्राच्या वतीने आयोजित कार्यशाळेत मार्गदर्शन करताना डॉ. एम. एस. देशमुख. सोबत डॉ. संजय चोपडे, डॉ. के. बी. पाटील, डॉ. तृप्ती करेकट्टी.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 APR 2025
तरुण भारत

# दूरशिक्षणच्या माध्यमातून ऑनलाईन शिक्षणाची संधी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या वतीने यंदाच्या शैक्षणिक वर्षात चार नवीन प्रमाणपत्र अभ्यासक्रमांना पूर्णत: ऑनलाईन स्वरूपात सुरू करण्यास मान्यता देण्यात आली आहे. तरी इच्छुकांनी शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण केंद्राशी संपर्क साधावा, असे आवाहन प्रभारी संचालक डॉ. के. बी. पाटील यांनी दिली.

- **इच्छुकांनी शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण केंद्रात संपर्क साधण्याचे आवाहन**

सर्टिफिकेट कोर्स इन कॉम्प्युटर अकाउंटिंग, सर्टिफिकेट कोर्स इन डिजिटल मार्केटिंग, सर्टिफिकेट कोर्स इन बेसिक्स ऑफ अकाउंटिंग, सर्टिफिकेट कोर्स इन फंडामेंटल्स ऑफ इफेक्टिव्ह मॅनेजमेंट हे अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना आधुनिक कौशल्ये प्राप्त करून देऊन नोकरीच्या आणि व्यवसायाच्या नव्या संधी उपलब्ध करून देतील. अभ्यासक्रमांचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे पूर्णत: ऑनलाईन शिक्षण पद्धती, रेकॉर्डेड अध्ययन साहित्य, विषयतज्ज्ञांशी चर्चा, ऑनलाईन संपर्क सत्रे, ऑनलाईन मूल्यमापन आणि अत्यंत माफक शुल्क. त्यामुळे विद्यार्थी घरबसल्या आणि नोकरी–व्यवसाय सांभाळून हे अभ्यासक्रम पूर्ण करू शकतात. इच्छुकांनी डॉ. सुशांत माने, डॉ. केतकी पवार, प्रा. प्रियांना सीर्वे, डॉ. नगीना माळी यांच्याशी संपर्क साधावा.

17 APR 2025
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ...तर कोल्हापूरचा इतिहासच वेगळा असता

## खासदार शाहू महाराज यांचे प्रतिपादन; छत्रपती राजाराम महाराज (दुसरे) पुस्तकाचे प्रकाशन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

तत्कालीन परिस्थितीत सोयी नसताना राजाराम महाराज इंग्लंडला गेले. तेथील परिस्थतीचा अभ्यास केला; पण परत येताना त्यांचे निधन झाले. ही दुःखद घटना घडली नसती तर कोल्हापूरचा इतिहासच वेगळा असता, असे प्रतिपादन खासदार शाहू महाराज यांनी केले. शिवाजी विद्यापीठातर्फे डॉ. इस्माईल पठाण लिखित छत्रपती राजाराम महाराज करवीर (दुसरे) आणि यात्रा युरोपची छत्रपती राजाराम महाराज दुसरे यांची रोजनिशी १८७० या प्रा. रघुनाथ कडाकणे अनुवादित दोन ग्रंथांचे प्रकाशन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाले, यावेळी खासदार शाहू महाराज बोलत होते. मेन राजाराम हायस्कूलमधील दरबार हॉलमध्ये हा कार्यक्रम झाला.



कोल्हापूर : छत्रपती राजाराम महाराज करवीर (दुसरे) यांच्या ग्रंथांच्या प्रकाशनप्रसंगी खा. शाहू महाराज. सोबत मान्यवर.

ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार म्हणाले, राजाराम महाराज चौकस बुद्धीचे राजे होते. कोल्हापूरच्या प्रगतीसाठी काय करता येईल, हे अभ्यासण्यासाठी परदेशात गेले. ते महाराष्ट्रातील पहिले राजे होते, ज्यांनी अभ्यासासाठी युरोप दौरा केला.

नाबार्डचे माजी अध्यक्ष डॉ. यशवंत थोरात, डॉ. इस्माईल पठाण, डॉ. रघुनाथ कडाकणे आदींनी मते मांडली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, १८७० च्या काळात 'स्टडी टूर'ची संकल्पना राबवणारे राजाराम महाराज हे पहिले संस्थानिक होते.

प्रारंभी बाळ पाटणकर यांनी प्रास्ताविक केले. यावेळी माजी मंत्री विक्रमसिंह पाटणकर यांचेही भाषण झाले. पंडित कंदले यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमास डॉ. सुनीलकुमार लवटे, व्ही. बी. पाटील, ज्येष्ठ पत्रकार श्रीराम पवार, वसंत भोसले, डॉ. भगवान हिर्डेकर, गजानन खाडे, ऋतुराज इंगळे, माजी कुलगुरू माणिकराव साळुंके, माणिकराव मंडलिक, डॉ. रमेश जाधव, आनंद माने, अरुणकुमार गोयंका, अमरजा निंबाळकर, विजय मेनन, प्रवीणसिंह घाटगे, विक्रांत कदम, संग्राम पाटील, प्राचार्य जी. पी. माळी यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

17 APR 2025
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आगामी काळात भावनेच्या राजकारणाचाच जगाला धोका

## डॉ. गोपाळ गुरू : ज्येष्ठ राजकीय विश्लेषक डॉ. श्रीराम पवार यांच्या पुस्तकांवर चर्चासत्र

■ सकाळ वृत्तसेवा


कोल्हापूर, ता. १६ : 'भावनेच्या राजकारणाचाच येत्या काळात जगाला मोठा धोका असल्याचे स्पष्ट मत ज्येष्ठ विचारवंत डॉ. गोपाळ गुरू यांनी व्यक्त केले. ज्येष्ठ राजकीय विश्लेषक व आंतरराष्ट्रीय घडामोडींचे अभ्यासक डॉ. श्रीराम पवार यांच्या पुस्तकांचे प्रकाशन व चर्चासत्र, अशा संयुक्त कार्यक्रमात ते बोलत होते. करवीर नगर वाचन मंदिरात कार्यक्रम झाला. अध्यक्षस्थानी 'नाबार्ड'चे माजी अध्यक्ष डॉ. यशवंतराव थोरात होते. दरम्यान, 'जग बदलताना' आणि 'धुमसता शेजार' या दोन पुस्तकांचे प्रकाशन कार्यक्रमात झाले. 'सकाळ' प्रकाशनाने ही पुस्तके प्रकाशित केली आहेत.

डॉ. गोपाळ गुरू म्हणाले, 'भावना आणि विवेक याचे तारतम्य हवे; पण जगभरातील राजकारणाचा सध्याचा प्रवाह पाहिला, तर तो खूपच भावनेच्या आहारी गेला आहे. या पार्श्वभूमीवर तगण्याचे आणि करण्याचे राजकारण समजून घेणे ही समाजातील सर्वच घटकांची जबाबदारी राहणार आहे. त्यासाठी डॉ. पवार यांची दोन्ही पुस्तके मार्गदर्शक आहेत. त्यांनी त्याबाबतची आपली ठाम भूमिका पुस्तकातून मांडली आहे. राज्यशास्त्राला अनेक नवे शब्दही त्यांनी लिखाणातून दिले असून, राज्यशास्त्राच्या विद्यार्थ्यांनी तर ही पुस्तके अभ्यासायलाच हवीत.'

डॉ. यशवंतराव थोरात म्हणाले, 'कुठल्याही परिस्थितीला मान्य करून जगण्याची मानसिकता वाढली असताना डॉ. पवार यांची पुस्तके प्रत्येकाला विचार करायला लावणारी आहेत. सध्याच्या राजकीय वातावरणात थेटपणे भूमिका घेऊन लिहिण्याचे धाडस फारसे कुणी करत नाही. मात्र, डॉ. पवार केवळ देशाच्याच नव्हे, तर आंतरराष्ट्रीय राजकारणावर थेट भूमिका घेऊन लिहितात, ही कोल्हापूरसाठी अभिमानाची बाब आहे.'

आंतरराष्ट्रीय घडामोडींचे अभ्यासक प्रा. डॉ. रोहन चौधरी म्हणाले, 'आपल्या नजरेतूनच सामान्य माणसाने जग पाहावे, यासाठी गेल्या काही वर्षांत जाणीवपूर्वक प्रयत्न होऊ लागले आहेत. शेजारच्या देशांना धुमसते ठेवण्यामागे नक्कीच राजकीय स्वार्थ आहे. या साऱ्या पार्श्वभूमीवर अशा बदलत्या राजकारणावर डॉ. पवार मराठी भाषेतून विपुल लेखन करतात. नव्या पिढीसाठी नक्कीच त्यांची पुस्तके दिशादर्शक आहेत.'

दरम्यान, 'सकाळ'चे संपादक निखिल पंडितराव, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते पीटर चौधरी, सचिन जाधव, राहुल चौधरी यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. 'सकाळ'चे उपसंपादक सुजितकुमार पाटील यांनी प्रास्ताविक केले. मोहसीन पठाण यांनी सूत्रसंचालन केले. यूथ डेव्हलपमेंट फाउंडेशनने संयोजन केले.



कोल्हापूर : डॉ. श्रीराम पवार लिखित 'धुमसता शेजार' आणि 'जग बदलताना' या पुस्तकांचे प्रकाशन बुधवारी झाले. यावेळी डावीकडून निखिल पंडितराव, डॉ. पवार, डॉ. यशवंतराव थोरात, डॉ. गोपाळ गुरू, प्रा. डॉ. रोहन चौधरी.

### जग चालवणारी वेगळीच यंत्रणा ...

■ डॉ. श्रीराम पवार म्हणाले, 'संपूर्ण जगात सध्या अस्वस्थता आहे. डोनाल्ड ट्रम्प यांच्या टॅरीफ धोरणानंतर तर पुन्हा आता अनेक नवी आव्हाने जगासमोर उभी ठाकली आहेत. त्यातून जग चालवणारी किंवा जगावर वर्चस्व प्रस्थापित करू पाहणारी एक वेगळीच यंत्रणा उभी राहत असून त्याचा सर्वसामान्य माणसाच्या जगण्याशी संबंध आहे आणि म्हणूनच ठाम भूमिका घेऊनच या साऱ्या घडामोडींकडे पाहावे लागते.'